माहिती हवीय?

पी. एस. म्हापसेकर, गोवा.

□ चित्रपटविषयक पहिलं नियतकालिक कोणतं? ते मासिक होतं की साप्ताहिक?

— १९३२ला निघालेले 'सिनेमा संसार' हे चित्रपटविषयक पहिलं नियतकालिक. ते साप्ताहिक होतं. हिंदीत निघालेलं होतं. राधा कृष्ण शर्मा या साप्ताहिकाचे संपादक होते.

□ विद्या सिन्हा व माला सिन्हा यांचं काही नातं आहे काय? त्या दोघी सध्या काय करतात?

— विद्या व माला सिन्हाचं काही नातं नाही. माला सिन्हा सध्या मुंबईत निवृत्त जीवन जगत आहेत. तर विद्या सिन्हा पुण्यात निवृत्त जीवन जगत आहेत.

संतोष हालकुडे, कुर्डुवाडी.

□ चित्रपट प्रदर्शित झाल्यावर मागाहून गाणं टाकण्याची प्रथा कोणत्या चित्रपटापासून सुरू झाली?

— १९४९च्या राज कपूरच्या *बरसात* या चित्रपटापासून. या चित्रपटातील शंकर-जयकिशन यांच्या संगीतात रफीने गायलेलं 'मैं जिंदगी में हरदम रोता ही रहा हूं...' हे गाणं चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्या चित्रपटात घुसडण्यात आलेलं आपल्या चित्रपटातील पहिलं गाणं.

संजीवनी नाईक, सातारा.

□ शाहू मोडकनी कृष्णाची व जीवनने नारदाची भूमिका कोणत्या चित्रपटात केली?

— शाहू मोडकनी २९ चित्रपटांत कृष्णाची भूमिका केली. तर जीवननी ५० चित्रपटांत नारदाची भूमिका केली.

□ अशोककुमारनी नायकाची भूमिका केलेला शेवटचा चित्रपट कोणता? नायिका कोण? दिग्दर्शक कोण? त्यांना कोणत्या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला?

— १९६२चा हाँगकाँग अशोककुमारनी नायकाची भूमिका केलेला शेवटचा चित्रपट. बी. सरोजादेवी या चित्रपटात त्यांची नायिका होता. *पाछी* या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. *आशीर्वाद*साठी त्यांना सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.


अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ शशिकलाने नायिकेची भूमिका केलेले हिंदी व मराठी चित्रपट कोणते? नायक कोण?

— *नजारे*(सतीश), *बॉम्बे*(उदयकुमार), *गर्ल्स स्कूल*(सज्जन), *ठेस*(भारत भूषण), *रुपय्या*(मनमोहन), *समाज*(अशोककुमार), *डाकू*(शम्मी कपूर), *सखी लुटेरा*(कामरान), *हूर-ए अरब*(प्रदीपकुमार), *अरब का सौदागर* (प्रदीपकुमार), *भागमभाग*(किशोरकुमार), *कर भला*(नासीर खान), *सबसे बडा रुपय्या* (आगा), *ताज और तलवार*(दलजीत), *कॅप्टन किशोर*(सुरेश), *जहाजी लुटेरा*(जय राज), *चलता पूर्जा*(कामरान), *जंग बहादूर* (चंद्रशेखर), *सुरंग*(विनोदकुमार), *सुन तो ले हसीना*(रवींद्र कपूर), *आबे हयात* (प्रेमनाथ), *खुबसूरत धोका*(रवींद्र कपूर), *दो आदमी*(जयराज), *रंगीला राजा* (महिपाल), *करोडपती*(किशोरकुमार) या हिंदी व *ये रे माझ्या मागल्या*(दामुअण्णा मालवणकर), *झालं गेलं विसरून जा*(राजा गोसावी), *यंदा कर्तव्य आहे*(राजा गोसावी), *सलामी*(सूर्यकांत) या मराठी चित्रपटात शशिकलाने नायिकेची भूमिका केली.

रविकांत साखरे, जामखेड.

□ परेश रावलला कोणकोणत्या चित्रपटासाठी पुरस्कार मिळालाय?



सरमधील पुरस्कारप्राप्त भूमिकेत नसीरुद्दीन शाहसह परेश रावल

— *सर*साठी त्याला फिल्म फेअर पुरस्कार मिळाला होता. तर *सर* व *वो छोकरी* या दोन चित्रपटांसाठी १९९४ला राष्ट्रीय पुरस्कार.

ज्योती कदम, महाड.

□ पूजा पवारचा पहिला चित्रपट कोणता? तिने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या? सध्या ती काय करते?

— पूजा पवारचा पहिला चित्रपट *सर्जा*. त्यानंतर *राजाने वाजवला बाजा, अनुराधा, एक होता विदूषक, झपाटलेला, टोपीवर टोपी, विश्वविनायक, माझा छकुला, प्रेमाच्या सुलट्या बोंबा, चिकट नवरा, एप्रिल फू, सनसनाटी* यासारख्या मोजक्याच चित्रपटात पूजा पवारने भूमिका केल्या. सध्या ती पुण्यात आपल्या संसारात रममाण झालीय.

संतोष मांडरे, माजरी चंद्रपूर.

□ चित्रपटसृष्टीत कोणकोणत्या कलावंतांनी आत्मचरित्र लिहिलंय?

— हंसा वाडकर(सांगत्ये ऐका), बाबूराव पेंढारकर(चित्र आणि चरित्र), लीला चिटणीस (चंदेरी दुनियेत), दिनकर द. पाटील (पाटलाचा पोर), जयश्री गडकर(मी जयश्री गडकर), सी. रामचंद्र(माझ्या जीवनाची सरगम), अनंत माने(अनंत आठवणी), व्ही. शांताराम(शांतारामा), भालजी पेंढारकर (साधा माणूस), गजानन जागीरदार (संध्याकाळ, पाऊलखुणा), विश्राम बेडेकर(एक झाड दोन पक्षी), सीमा देव (सुवासिनी), चंद्रकांत(थोरली पाती), स्नेहप्रभा प्रधान (स्नेहांकित), सूर्यकांत (धाकटी पाती), कॅमेऱ्याच्या पाठीमागे (त्यागराज पेंढारकर), केशवराव धारकर (एका जिंदगानीची पटकथा), जोग (मी गुंड्याभाऊ), दादा कोंडके(एकटा जीव), दुर्गा खोटे(मी दुर्गा खोटे), वसंत शिंदे (विनोदाचा वटवृक्ष) आदी कलावंतानी.

सुधाकर परुळेकर, पुणे.

□ 'ए मेरे दिल मत कर किसी पे एतबार हर कदम पे है धोखे हजार...' व 'जीवन में कभी तू डरना नही...' ही गाणी कोणत्या चित्रपटातील? कलाकार, संगीतकार व गायक कोण?

— 'ए मेरे दिल मत कर किसी पे एतबार हर कदम पे है धोखे हजार...' हे गाणे १९७१च्या *अलबेला*तील तर 'जीवन में कभी तू डरना नही...' हे गाणे १९७४च्या *खोटे सिक्के*तील दोन्ही गाणी किशोरकुमारने गायली होती. अलबेलाचे कलाकार होते मेहमूद, अरुणा ईराणी, नम्रता, अन्वर अली, आय. एस. जोहर, रमेश देव, धुमाळ, मोहन चोटी, राजेंद्रनाथ, ब्रह्मचारी, मुकरी, असित सेन, लीला मिश्रा, जॉनी व्हीस्की, दिलीप दत्त. संगीत शंकर-जयकिशन, *खोटे सिक्के*चे कलाकार फिरोज खान, नरेंद्र नाथ, रेहाना सुलतान, अलका, अजीत, पेंटल, डॅनी, सुधीर, संगीत आर. डी. बर्मन.